**स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील घनकचरा व्यवस्थापनाची कामे खाजगीरित्या (Outsource) करून घेण्यासाठी केलेल्या करारानाम्यातील अटी व शर्तीचे पालन करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-२०१९/प्र.क्र.४९/नवि-४**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
४ था मजला, मंत्रालय, मुंबई.
दिनांक :- २० मे, २०१९

**वाचा :-**

१. शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्रमांक स्वभाअ २०१५/प्र.क्र.२३/नवि ३४, दिनांक १५.०५.२०१५.
२. शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्रमांक टिएफसी२०१५/प्र.क्र.१०६/नवि-०४, दि.०३.०८.२०१५.
३. शासन परिपत्रक, नगर विकास विभाग, क्रमांक स्वमअ-२०१७/प्र.क्र.४१/नवि-३४, दिनांक २९.०४.२०१७.

**शासन परिपत्रक :-**

१४ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना प्राप्त होणाऱ्या मूलभूत अनुदानातील किमान ५० टक्के एवढा निधी स्वच्छ भारत अभियानातील बाबींवर खर्च करण्याचे संदर्भीय क्रमांक २ येथील दिनांक ०३ ऑगस्ट, २०१५ च्या शासन निर्णयान्वये बंधनकारक करण्यात आले असून, सदर शासन निर्णयातील परिच्छेद १(II)(i) मध्ये नमूद करण्यात आलेली स्वच्छ भारत अभियानाशी संबंधित कामे या निधीमधून करण्यास मुभा देण्यात आलेली आहे.

२. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना स्वच्छ भारत अभियानांतर्गत घनकचऱ्याचे संकलन, वाहतुक व त्यावरील प्रक्रिया ही कामे खाजगीरीत्या (Outsourcing द्वारे) करण्यासाठी १४ व्या वित्त आयोगाच्या अनुदानातून उपलब्ध होणाऱ्या निधीचा विनियोग करण्यास संदर्भीय क्रमांक ३ येथील दिनांक २९.०४.२०१७ च्या शासन परिपत्रकान्वये सूचना देण्यात आल्या आहेत.

३. त्यानुसार, राज्यातील बहुतांश नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या शहरातील घनकचरा व्यवस्थापनांतर्गत संकलन, वाहतुक व त्यावरील प्रक्रिया ही कामे खाजगीरीत्या (Outsource) करण्यासाठी विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून संबंधित संस्थांसोबत करारनामा केला आहे.

४. शहरातील घनकचरा संकलन, वाहतुक व त्यावरील प्रक्रिया ही कामे खाजगीरित्या (Outsourcing द्वारे) करताना, ती संबंधितांबरोबर केलेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार होत असल्याची खातरजमा करणे अत्यावश्यक आहे.

५. वरील परिच्छेदात नमूद केलेल्या वस्तूस्थितीच्या अनुषंगाने **शासन खालील प्रमाणे सूचना देत आहे :-**

(१) शहरातील घनकचरा संकलन, वाहतुक व त्यावरील प्रक्रिया ही कामे खाजगीरीत्या (Outsourcing द्वारे) कंत्राटदारांमार्फत करून घेत असताना त्यासाठी संबंधित कंत्राटदारासोबत केलेल्या **करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार ही सर्व कामे करुन घेणे आवश्यक आहे** व त्यानुसार देयक अदा करण्यापूर्वी **करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार कामे झाल्याची खातरजमा करणे** संबंधित आयुक्त, महानगरपालिका/ मुख्याधिकारी नगरपरिषद/ नगरपंचायत यांच्यावर बंधनकारक आहे.

(२) या सर्व कामाच्या अनुषंगाने सादर झालेल्या देयकाची तपासणी करताना, मूळ करारनाम्यात संबंधित खाजगी कंत्राटदाराद्वारे **घनकचरा संकलन, वाहतूक व प्रक्रिया असे तिन्ही घटक** समाविष्ट असल्यास प्रत्यक्षात **या तिन्ही घटकांबाबतची कामे पूर्ण झाल्याची खातरजमा करणे आवश्यक आहे.** तशी ती झाली नसतील तर अशा अपूर्ण कामासाठी प्रदान करणे उचित होणार नाही. त्याचप्रमाणे जेथे फक्त **घनकचरा संकलन व वाहतुकीचे काम** खाजगीरित्या (Outsourcing द्वारे) कंत्राटदारामार्फत करुन घेण्यात येत असेल त्या ठिकाणी घनकचरा संकलन व वाहतूक ही **दोन्ही कामे पूर्ण झालेली असल्याची खातरजमा करणे** आवश्यक आह, अन्यथा ते काम अपूर्ण मानावे लागेल व त्यासाठी कोणतेही प्रदान देय ठरणार नाही.

(३) शहरातील घनकचरा संकलन, वाहतुक व त्यावरील प्रक्रिया ही कामे खाजगीरीत्या (Outsourcing द्वारे) कंत्राटदारामार्फत करुन घेत असताना अशा देयकाचे प्रदान करण्यापूर्वी त्याकरीता आवश्यक त्या सर्व टप्प्यांची पूर्तता झाल्याची खातरजमा करण्यासाठी तपासणी सूची (Check List) तयार करावी व या तपासणी सूचीनुसार तपासणी करावी. अशा देयकाची तपासणी करण्यासाठी सर्व आयुक्त, महानगरपालिका/ मुख्याधिकारी, नगरपरिषद/ नगरपंचायत यांनी सक्षम यंत्रणा व प्रमाण कार्यकारी कार्यपध्दती (Standard Operating Procedure) निश्चित करुन घ्यावी व प्रत्येक टप्प्यावर आवश्यक त्या यंत्रणेमार्फत त्या त्या टप्प्याचे काम झाल्याचे प्रमाणिकरण झाल्याची खातरजमा करावी. अशाप्रकारे खातरजमा न करता कोणतेही देयक अदा केले जाणार नाही, याची दक्षता घ्यावी. (उदा. जसे स्थापत्य कामाच्याबाबतीत MB रेकॉर्डींग करणे, त्याची तपासणी करणे, त्यानुसार देयकाची परिगणना करणे, त्या परिगणनेची फेरतपासणी करणे व त्यानंतर देयक प्रदान करणे अशी विहीत कार्यपध्दती अवलंबली जाते, तशाच स्वरुपाची सविस्तर कार्यपध्दती विहीत करण्यात यावी.)

(४) करारनाम्यातील अटी व शर्तींचे पालन झाले नसतानाही कंत्राटदाराचे देयक अदा केल्यास संबंधित आयुक्त, महानगरपालिका/ मुख्याधिकारी नगर परिषद/ नगरपंचायत यांना व्यक्तीशः

जबाबदार धरण्यात येईल व त्यांच्या विरूध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरू करण्यात येईल याची त्यांनी कृपया नोंद घ्यावी.

(५) विभागीय मेंटॉर, प्रादेशिक उपसंचालक/ सहायक संचालक व विभागीय तांत्रिक तज्ञ यांना दरमहा क्षेत्रिय भेटीच्या सूचना यापूर्वीच देण्यात आल्या आहेत. त्यांनी त्यांच्या भेटींदरम्यान या परिपत्रकातील सूचनांचे काटेकोर पालन होत असल्याची तपासणी करावी व त्याबाबतची वस्तूस्थिती त्यांच्या अहवालात निश्चितपणे नमूद करावी. या विषयाच्या अनुषंगाने त्यांनी त्यांचा अहवाल नियमितपणे शासनास सादर करावा.

६. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०१९०५२०१४४११६६४२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

Pandurang Jotiba Jadhav

Digitally signed by Pandurang Jotiba Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=300d785e12fdc19db0612f1ffdf83e54efe7da2b1bc63d18df8e09b3c7eece65, cn=Pandurang Jotiba Jadhav
Date: 2019.05.20 16:01:27 +05'30'

**(पां. जो. जाधव)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.राज्यमंत्री, नगर विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. नगराध्यक्ष, नगरपरिषदा/ नगरपंचायती (संबंधित)
४. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव (नवि-२) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. आयुक्त, तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
७. जिल्हाधिकारी (संबंधित)
८. आयुक्त, सर्व महानगरपालिका
९. राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभिया न (नागरी) मुंबई.
१०. उप संचालक, नगरपालिका शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)
११. जिल्हा प्रशासन अधिकारी, नगरपालिका शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व)
१२. मुख्याधिकारी, नगरपरिषदा / नगरपंचायती (संबंधित)
१३. निवडनस्ती, नवि-४.